REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331 (UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 7 | APRIL - 2018

# कुटूंब संस्था आणि मुलाचे सामाजिक आरोग्य




**प्रा. दिपक रामचंद्र राऊत-पवार**
**विभाग प्रमुख , मानसशास्त्र विभाग , नामदेवराव सुर्यवंशी (बेडके) महाविद्यालय**
**फलटण, ता. फलटण, जि. सातारा.**

**सारांश**

एकत्र व विभक्त कुटुंबातील मुलां मुलींच्या समायोजन व स्वसंकल्पनेचा तुलानात्मक अभ्यास करण्याच्या हेतूने प्रस्तुत संशोधन हाती घेण्यात आले. फलटण, लोणंद, तरडगाव इ. ठिकाणी एकत्र व विभक्त कुंटुबात राहणाऱ्या १७ ते १८ या वयोगटातील ४० विद्यार्थ्यांची नमुना म्हणून निवड करण्यात आली. नमुन्यातील माहिती मिळविण्यासाठी सिन्हा व सिंग यांची समायोजन प्रश्नावली व सारस्वत यांची स्व संकल्पना प्रश्नावली वापरण्यात आली. प्रदलाचे सांख्यिकीय विश्लेषण करण्यासाठी मध्यांक, मध्यमान, प्रमाण, विचलन आणि टी गुणांक मिळविण्यात आला. संशोधनाअंती असे दिसून आले की,

१) एकत्र व विभक्त कुटुंबातील मुलां मुलींच्या समायोजनामध्ये तुलनात्मक भेद दिसून येत नाही.
२) एकत्र व विभक्त कुटुंबातील मुलां मुलींच्या संकल्पनेमध्ये तुलनात्मक भेद दिसून येत नाही.

## ✷ शीर्षक

एकत्र व विभक्त कुटुंबातील मुला-मुलींच्या समायोजन व स्व-संकल्पनेचा तुलनात्मक अभ्यास.

## ✷ समस्या विधान

एकत्र व विभक्त कुटुंबातील मुला-मुलींच्या समायोजन व स्व-संकल्पनेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

## I) प्रस्तावना

मनुष्य हा समाजशील प्राणी असून त्याच्यामध्ये भूक, तहान आणि लैंगिकता या जैविक प्रेरणा तर जवळीकता, संलग्नता, एकमेकांजवळ राहण्याची गरज या सामाजिक प्रेरणा दिसून येतात. मनुष्य हा आदिकाळापासून ते आजपर्यंत एकत्रित राहताना किंवा एकमेकांच्या बरोबर दिसून येतो. परंतू मागचा कालखंड आणि आजचा कालखंड पाहता एकत्र कुटुंब पध्दती आणि विभक्त कुटुंब पध्दती या कुटुंबाच्या दोन पध्दती आपणाला पहायला मिळतात. एकत्र कुटुंब पध्दतीमध्ये प्रामुख्याने आजी आजोबा, काका काकी त्याचबरोबर अनेक भावंडे एकत्र राहताना दिसून येतात. तर आज नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात व्यक्तींना स्थलांतर करावे लागत आहे. त्याचप्रमाणे मानवी मुल्यांमध्ये झालेल्या हेळसांडीचा परिणाम किंवा झालेली हेळसांड यामुळे दोन व्यक्तींच्या मतभिन्नतेचा परिणाम म्हणून सुध्दा विभक्त कुटुंबाची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे आणि त्याच्यामुळे एकूणच या कुटुंबामुळे वाढणाऱ्या आणि विकसित होणाऱ्या मुलांच्या समायोजन आणि स्व-संकल्पना यामध्ये नेमका भेद दिसून येतो का हे पाहण्यासाठी प्रस्तुत संशोधन हाती घेतले आहे.


## संशोधन विषयातील महत्वाच्या संकल्पना

### १) समायोजन

समायोजन ही व्यक्तीच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत अखंडपणे चालणारी एक प्रक्रिया आहे. बालपणात एकदा समायोजन केल्याने जीवनातील सर्व समस्या सुटत नाहीत. प्रत्येक विकास अवस्थेला व्यक्तीला वेगवेगळ्या समायोजन करावे लागते.
''वैयक्तिक आवडीनिवडी, गरजा तसेच सामाजिक घटना यांना अनुलक्षून योग्य त्या समाजमान्य प्रतिक्रिया देणे म्हणजेच समायोजन होय.''

**अ) समायोजन प्रक्रिया**

समायोजन ही एक प्रक्रिया




**ब) सुसमायोजित व्यक्तीची वैशिष्टये**

- स्वत:विषयी वास्तववादी अभिवृत्ती
- सुरक्षिततेची भावना
- विधायक दृष्टिकोन
- सृजनशीलता
- वातावरणात बदल घडवून आणण्याची क्षमता
- स्वत:मध्ये बदल घडवून आणण्याची क्षमता
- गरजांची पूर्तता व वातावरण यामध्ये समन्वय साधणे.
- मानसिक ताण, निराशा सहन करण्याची क्षमता
- काळजी केव्हा करावी हे समजणे.
- भावनिक नियंत्रण.
- समस्या परिहार
- जीवनविषयक तत्वज्ञान
- सारासार विचार करण्याची क्षमता

**२) स्व-संकल्पना**


आपण कसे आहोत, आपल्यामध्ये कोणकोणत्या शारिरीक, मानसिक, सामाजिक गोष्टी आहेत इत्यादींची प्रत्येक व्यक्तीला एक जाणीव असते. तिच्या मनात स्वत:बद्दल एक प्रतिमा तयार झालेली असते. व्यक्तीच्या मनात स्वत:बद्दल तयार झालेली ही सर्वसमावेशक प्रतिमा म्हणजे तिची स्व:संकल्पना होय असे म्हणता येते.

जेम्स यांच्या मते व्यक्तीचे म्हणून जे घटक येतात, त्यांचा समावेश स्व-संकल्पना हातो.

'व्यक्ती जगाकडे कसे पाहते आणि जग व्यक्तीला कसे ओळखते ते निश्चित करणारी व्यक्तीची स्वत:ची प्रतिमा म्हणजे त्या व्यक्तीची स्व-संकल्पना होय.'

'स्वत:ची स्वत:विषयीची प्रतिमा म्हणजे स्व-संकल्पना होय.'

**अ) स्व-संकल्पनेची वैशिष्ट्ये**



- **स्व-एकरूपता**

जन्मापासून स्व-संकल्पना विकसित झालेली नसते. बाह्य व अंतरंगातील अनेक स्त्रोत बालकाच्या एकरुपतेच्या विकासात हातभार लावतात. मूल आईकडून भाषा शिकते. जसजसे मूल वाढत जाते, तसतसा अनुभव वाढत जातो आणि सामाजिकरण होण्यास सुरूवात होते. 'मी' ऐवजी 'आम्ही', 'आमच्या' या शब्दांचा समावेश होतो.

- **स्व-मूल्यांकन**

यामध्ये व्यक्ती स्वतःचे चांगले, वाईट, कनिष्ठ, योग्य, अयोग्य इत्यादी संबंधात निर्णय घेऊ लागते. हे स्व-मूल्यांकन इतर लोक त्याच्याकडे कसे पाहतात यावरच पूर्णतः निर्भर असते. स्व-मुल्यांकन व्यक्तीच्या विकासात महत्वाची भूमिका बजावतो.

**-स्व-आदर्श**

व्यक्तीच्या स्व-संकल्पनेत एकरूपता आणि स्व-मूल्यांकनाबरोबर व्यक्तीच्या आशा-आकांक्षा, महत्वाकांक्षांना महत्वाचे स्थान आहे. यावरून व्यक्तीचा आदर्श कसा ठरविला जातो, स्व-आदर्शाची निवड पालक, मित्र, महत्वाच्या व्यक्ती यांच्यातून राष्ट्रभक्तीची प्रेरणा निर्माण होते.

हा स्व-आदर्श ठरू शकतो. हे शिक्षणातून साधता येते.

**ब) स्व-संकल्पनेस आकार देणारे घटक**

- स्व-निरीक्षण
- इतरांकडून प्रतिभरण
- सांस्कृतिक मूल्ये

## II) उद्दिष्ट्ये

१) एकत्र व विभक्त कुटुंबातील मुला-मुलींच्या समायोजनाचा तुलनात्मक अभ्यास करणे.
२) एकत्र व विभक्त कुटुंबातील मुला-मुलींच्या स्व-संकल्पनेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

## III) गृहितके

१) एकत्र व विभक्त कुटुंबातील मुला-मुलींच्या समायोजनाचा तुलनात्मक भेद दिसून येईल.
२) एकत्र व विभक्त कुटुंबातील मुला-मुलींच्या स्व-संकल्पनेमध्ये तुलनात्मक भेद दिसून येईल.

## IV) संशोधन पद्धती

### १) नमुना

फलटण, लोणंद, तरडगांव इ. ठिकाणी एकत्र व विभक्त कुटुंबात राहणाऱ्या १७ ते १८ या वयोगटातील ४० विद्यार्थ्यांची नमुना म्हणून निवड करण्यात आली. नमुन्यातील मुला-मुलींचे प्रमाण समान ठेवण्यात आले.

### २) मापन साधने

**अ) समायोजन प्रश्नसूची**

परिक्षार्थींच्या समायोजनाचे मापन करण्याचे सिन्हा व सिंग (२००२) यांनी तयार केलेली ही चाचणी वापरण्यात आली. या चाचणीत एकूण १०२ प्रश्न असून त्याद्वारे कौटुंबिक, आरोग्य, सामाजिक, भावनिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील समायोजनाचे मापन होते. प्रत्येक उत्तरासाठी 'हाँ' आणि 'नही' असक दोन पर्याय असून यातील स्वतःला जास्तीत जास्त लागू पडणारा एक पर्याय परिक्षणार्थीने निवडायचा असतो. मूळ चाचणीत हिंदी भाषेत आहे.

**ब) स्व-संकल्पना प्रश्नावली**

सहभागी तरूणांच्या स्व-संकल्पनेचे मापन करण्यासाठी सारस्वत (१९८४) यांनी तयार केलेली ही चाचणी वापरण्यात आली. या मापनाद्वारे स्व-संकल्पनेच्या शारिरीक, सामाजिक, स्वभावविषयक, शैक्षणिक, नैतिक आणि बौद्धिक अशा सहा पैलूंचे मापन होते. प्रत्येक पैलूचे मापन करणारे आठ प्रश्न असे एकूण ४८ प्रश्न या मापनीत आहेत. प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरासाठी पाच पर्याय दिलेले आहेत.

यातील स्वतःला जास्तीत जास्त लागू पडणारा एक पर्याय उत्तरदात्याला निवडावा लागतो. या पर्यायांना अनुक्रमे ५, ४, ३, २ आणि १ असे गुण दिले जातात. प्रत्येक पैलूवरील एक गुणा ंक या प्रमाणे सहा पैलूंवरील सहा गुणांक आणि एकूण गुणांक असे सात गुणांक मिळतात. प्रस्तुत अभ्यासात फक्त एकूण गुणांचाच विचार केला आहे. मूळ मापनी हिंदी भाषेत आहे.

### क) कार्यविधी

एकत्र व विभक्त कुटुंबात राहणाऱ्या ४० विद्यार्थी-विद्यार्थीनींकडून प्रदत्त गोळा करण्यात आला. या विद्यार्थ्यांना संशोधनाचे महत्व सांगून पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार प्रदत्त गोळा करण्याचे काम पूर्ण करण्यात आले.

## V) संख्याशास्त्रीय विश्लेषण व चर्चा

एकत्र व विभक्त कुटुंबात राहणाऱ्या मुला-मुलींच्या समायोजन व स्व-संकल्पनेचा तुलनात्मक अभ्यास करण्याच्या हेतूने प्रस्तुत संशोधन हाती घेण्यात आले.

**तक्ता १**

**एकत्र व विभक्त कुटुंबातील मुला-मुलींच्या समायोजनामधील तुलनात्मक भेद दर्शविणारा तक्ता**

| कुटुंब पध्दती | नमुना | मध्यांक | मध्यमापन | प्रमाण विचलन | टी-गुणांक | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|---|
| एकत्र | २० | ५९ | ६५.५० | १५.३२ | ०.२२ | ०.०५ पातळीवर सार्थ नाही |
| विभक्त | २० | ५८ | ५९.५० | १३.५६ | | |

### स्पष्टीकरण

संशोधनापूर्वी एकत्र व विभक्त कुटुंबातील मुला-मुलींच्या समायोजनामध्ये तुलनात्मक भेद दिसून येईल, असे गृहितक मांडले होते. तक्ता क्र. १ वरुन हे गृहितक अस्वीकृत झाल्याचे प्राप्त फलितांवरून दिसून येते. म्हणजेच एकत्र व विभक्त कुटुंब पद्धती कुटुंबाची रचना, कुटुबांतील व्यक्तींची संख्या या घटकांचा कोणताही परिणाम समायोजन प्रक्रियेवर झाल्याचे दिसून येत नाही.

**तक्ता २**

**एकत्र व विभक्त कुटुंबातील मुला-मुलींच्या स्व-संकल्पनेमधील तुलनात्मक भेद दर्शविणारा तक्ता**

| कुटुंब पध्दती | नमुना | मध्यांक | मध्यमापन | प्रमाण विचलन | टी-गुणांक | सार्थकता |
|---|---|---|---|---|---|---|
| एकत्र | २० | १६८ | १६७.२७ | ८.५३ | १.४१ | ०.०५ पातळीवर सार्थ नाही |
| विभक्त | २० | १७४.५० | १७५.५० | १८.८१ | | |

### स्पष्टीकरण

संशोधनापूर्वी एकत्र व विभक्त कुटुंबातील मुला-मुलींच्या स्व-संकल्पनेमध्ये तुलनात्मक भेद दिसून येईल, असे गृहितक मांडले होते. तक्ता क्र. २ वरून हे गृहितक अस्वीकृत झाल्याचे प्राप्त फलितांवरून दिसून येते. म्हणजेच एकत्र व विभक्त कुटुंब पद्धती, कुटुंब रचना, कुटुंबातील व्यक्तींची संख्या, कुटुंबामध्ये वयोवृद्धांचा आधार असणे किंवा नसणे या घटकांचा स्व-संकल्पनेवर परिणाम झाल्याचे दिसून येत नाही.

थोडक्यात, एकत्र व विभक्त कुटुंबातील मुला-मुलींच्या समायोजन व स्व-संक्लपनेमध्ये तुलनात्मक भेद दिसून येत नाही.

## VI) उपसंहार

### १) निष्कर्ष

१) एकत्र व विभक्त कुटुंबातील मुला-मुलींच्या समायोजनेमध्ये तुलनात्मक भेद दिसून येत नाही.

२) एकत्र व विभक्त कुटुंबातील मुला-मुलींच्या स्व-संकल्पनेमध्ये तुलनात्मक भेद दिसून येत नाही.

**२) मर्यादा**

संशोधनासाठी मर्यादीत स्वरूपात नमुना व गृहितके मांडण्यात आलेली आहेत.

**३) शिफारशी**

संशोधनासाठी व्यापक स्वरूपात नमूना व गृहितके मांडून विस्तृत संशोधन हाती घेता येईल.

**संदर्भ सूची**


1) Saraswat, Rajkumar (1984) : "Manual for Self Concept Questionnarie." National Psychological Corporation, Agra
2) Weiten, W. and L Lloyd, M. (2004) : "Psychology Applied to Modern Life". Thomson Asia Pte. Ltd.
3) व्यापक जाधव, एम. जी. मिसाळ, तानाजी आणि पाटील, मेघाराणी (२००७) : "शारीरिकदृष्ट्या व्यंग आणि निर्व्यंग विद्यार्थ्यांच्या स्व-संकल्पनेचा व समायोजनाचा एक अभ्यास, मानसशास्त्र पत्रिका, ऑक्टोंबर २००७, अंक १६, मराठी मानसशास्त्र परिषद."
4) तडसरे, वि. द. : मानसशास्त्र, इयत्ता १२ वी.





**प्रा. दिपक रामचंद्र राऊत-पवार**
**विभाग प्रमुख , मानसशास्त्र विभाग , नामदेवराव सुर्यवंशी (बेडके) महाविद्यालय**
**फलटण, ता. फलटण, जि. सातारा.**